# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

## (पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

**परिपत्रक क्र. 328/२०१९**

या परिपत्रकाव्दारे सर्व संबंधिताना कळविण्यात येते की, विद्यापीठ प्राधिकरणांवरील सन्माननीय सदस्यांना त्या त्या प्राधिकरणांच्या कार्यकक्षेतील कामकाजाकरिता आवश्यक असणारी माहिती किंवा प्राधिकरणांच्या बैठकीमधील निर्णयाच्या अनुषंगाने विभागांकडून/प्रशासकीय शाखांकडून करण्यात आलेल्या अंमलबजावणीबाबतची माहिती सत्वर प्राप्त करून घेता यावी व त्याकरिता विशेष व्यवस्था असावी या उद्देशाने स्वतंत्र कक्ष स्थापन करण्यात आला असून परिपत्रक क्रमांक १९९/२०१९ अन्वये विशेष कक्षामार्फत करण्यात येणाऱ्या कामकाजाची पध्दत तसेच माहिती प्राप्त करून घेण्यासाठी अर्ज करण्याची पध्दत विहित करण्यात आली आहे. सन्माननीय सदस्यांना सदरची माहिती ही ईमेलव्दारे देखील मागणी करता यावी, याकरिता खालील तरतूद करण्यात येत आहे.

विद्यापीठ प्राधिकरणांवरील सन्माननीय सदस्यांना ईमेलव्दारे माहितीची मागणी करावयाची असल्यास, त्यांनी परिपत्रक क्रमांक १९९/२०१९ मध्ये विहित केल्याप्रमाणे माहितीचा तपशील विनिर्दिष्ट करणारा अर्ज स्कॅन करून तो कुलसचिव कार्यालयाच्या regis@unipune.ac.in या इमेलवर पाठवावा. कुलसचिव कार्यालय सदर अर्जाची दखल घेऊन तो विद्यापीठाच्या माहिती अधिकारी कार्यालयातील विशेष कक्षाकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित करेल.

**(डॉ. प्रफुल्ल अ. पवार)**
**कुलसचिव**

**गणेशखिंड, पुणे. ४११ ००७.**
**जा.क्र. :- एएन्/ 4599**
**दिनांक :- 31/१२/२०१९.**

**<u>प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषित :-</u>**

१) मा. अधिसभा सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७.
२) मा. व्यवस्थापन परिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७.
३) मा. विद्यापरिषद सदस्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७.
४) मा. अधिष्ठाता, सर्व विद्याशाखा, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे - ०७.
५) सर्व विभागप्रमुख, शैक्षणिक विभाग, सा.फु.पु.वि. पुणे-०७ } सदर परिपत्रकातील आशय आपल्या विभागातील सर्व
६) सर्व शाखाप्रमुख, प्रशासकीय शाखा, सा.फु.पु.वि. पुणे-०७ } संबंधित सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावा.